
…हालय, ठाणे.
…ंत पुस्तक/मासिक परत करावे,
…) नतर …तिदिनी ५ पैसे




IRBK-0115872

सातारा जिल्ह्यातील माहुली क्षेत्री मंदिराचा वार्षिक उत्सव मोठ्या थाटामाटात चालू होता. देवपूजेनंतर सर्व उपस्थित ब्राह्मणांना-विद्वानांना व विद्यार्थ्यांना दक्षिणा वाटली जाणार!


वेदमंत्रांच्या उच्चारांनी आकाश भरून जात असता
राम्या! राम्या SS!
राम पाण्यात डुंबत होता. जास्त गंभीर वृत्तीच्या मित्रांची टवाळी करण्याचे काम चालूच होते!
कशाला ती भटजींची वटवट ऐकून वेळ फुकट घालवता? – शिरा पाण्यात! आपण शर्यत लावू या!
राम्या! ऐकू येत नाही? कान फुटले का? बाहेर ये अन् आंग पूस!
'राम्या' धडपडत काठावर आला.
काय झालं हो मामा? काही विशेष घडलं का?
विशेष? अरे लेका, ब्राह्मणांना दक्षिणा देताहेत. पळ, अन् घे मिळेल ते!
पण, मामा– मी विद्वान नाही अन् विद्यार्थी पण नाही!
ब्राह्मण तर आहेस? – वाद घालू नकोस. पळ! तुला खायला प्यायला मीच घालतो ना?
मामाच्या आज्ञेनरहुकूम राम धावला. पण–
दक्षिणा मात्र मी घेणार नाही!




IRBK-0115872


तो शास्त्रीबुवांपुढे जाऊन उभा राहिला.
हे परत घ्या.. मी विद्याभ्यासी नाही. माझा यावर हक्क नाही.
माघारा वळून तो गर्दीतून चालला असता त्याच्या मामांनी त्याला गाठले.
खबरदार घरात पाऊल टाकलंस तर! चालता हो इथून! मला तुझं तोंड पाहण्याची इच्छा नाही!
रामच्या मनाची शांतता ढळली नाही. त्याचा आत्मविश्वास खंबीर होता.
आता माझे पाय नेतील तिकडे मी जाईन.
प्रसन्न मनाने वाटचाल करीत त्याने सातारा शहर गाठले. आणि मग एका वळणावर एकदम—
ओहो! केवढा वाडा हा! इथे मला एखादी नोकरी मिळेल!


त्याच वेळी वाड्यातून एक पुजारी बाहेर आला.
इथे कोण राहतं हो ?
अनगळसाहेब. काय हवंय तुला, बाळ ?
नोकरी, मला ते कामावर ठेवतील ?
चल, ये. माझी पूजा अर्चा झालीय. मी आता मोकळा आहे.
आणि पुजारीबुवांनी रामला अनगळसाहेबांपुढे नेले.
नमस्कार कर. साहेब फार दयाळू आहेत. तुझ्या नशिबात असेल तर ताबडतोब काम होईल.
कोण रे तू? कुठून आलास ? काय हवंय तुला ?
मी माहुलीचा एक गरीब ब्राह्मण मुलगा आहे. मला काम हवंय.
आम्हाला एक हरकाम्या ब्राह्मण हवाच होता. तयार आहेस ?
आनंदाने, महाराज!



कपडे धुणं, पाणी काढणं, निरोप पोचवणं अशी कामं...
करीन– सगळं करीन!
मग आजच सुरवात कर. चार आठ दिवसांनी ठरवू तुला काय पगार द्यायचा ते.
अनगळांनी आपल्या मुकादमाला बोलावले.
याला तुझ्या बाईंकडे घेऊन जा. आजपासून तो वाड्यात कामाला आहे.
रामच्या अग्निदिव्याला सुरवात झाली.
राम्या! अजून भांडी घासून झाली नाहीत तुझी! हौदात पाणी भरलेलं नाही, बघ!
अनेकदा त्याचा अपमान व्हायचा.
ए ठोंब्या! अजून तुझी खादाडी चाललीय? समजतोस कोण स्वतःला?
रामला पुष्कळदा वाटे– सोडावी ही नोकरी! पण–
नाही. मी पुन्हा माझ्या खोटारड्या मामांकडे भीक मागायला जाणार नाही!


दिवसांमागून दिवस गेले. रामला कामाची सवय झाली.
राम्या! झालं की नाही खाणं तुझं? पुजारीबुवा बोलावताहेत!
हं. आटोपलंच. आलोच मी.
एक दिवस त्याच्या मनात आले–
मी जर पुजारी झालो तर मला अभ्यासाला पुरेसा वेळ मिळेल.
त्या दिवशी पुजारीबुवांना मदत करीत असता–
बाबा, मंत्र जरा सावकाश म्हणाल का? मलाही ते पाठ करायचे आहेत.
पुजारीबुवांना गंमत वाटली.
अरे वेड्या, तुला ते कसं जमेल? संस्कृत शब्द कठीण असतात. अगदी बाळपणीच ते तोंडात बसावे लागतात.
नाही! येतील मला ते! म्हणा ना बाबा.
पुजारीबुवा हसले. त्यांनी मंत्र सावकाश उच्चारायला सुरवात केली. इतक्यात–
राम्या– राम्या!


दुसऱ्याच क्षणी मुकादम रागा रागाने खोलीत शिरला.
कान फुटले का तुझे? इथे काय करतो आहेस? तास झाला- अजून खाली आला नाहीस?
च्-च्!
साहेब यायला झालेत. त्यांचं पाय धुण्याचं पाणी कुठाय?
जा बाबा राम! पुढचं उद्या करू-
रामला पुढे ढकलीत मुकादम खोलीबाहेर गेला.
राम चांगला पुढे येईल! केवढी एकाग्रता ही!
अनगळ आले तेव्हा राम पाणी घेऊन तयार होता.
अनगळांनी आपले पाय चौरंगावर ठेवले.
अहाहा! असे मोती जर माझ्या कानात असते...
अनगळसाहेब भडकले.
मूर्खा! लक्ष कुठाय तुझं? कसला विचार करतो आहेस?
आपल्या भिकबाळीचा, महाराज.



का रे? अशी भिकबाळी घालावीशी वाटतेय, होय?
होय, महाराज!
तेवढी योग्यता असावी लागते अंगात!
मी आणीन.
हाः हाः! ती कशी? गड्याची कामं करून?
त्याला दुखवावे असा अनगळांचा हेतू नव्हता. पण रामच्या मनाला ते बोलणे लागले.
साहेब! मी यापुढे आपला गडी नाही!
अँ?
रामच्या मनावर अनपेक्षित परिणाम
केला स्वर सौम्य,प्रेमळ बनला.
मग काय करणार आहेस तू?
काशीला जाऊन गुरू शोधीन. गुरूजवळ विद्या शिकेन. शास्त्री होईन. तेव्हाच पुन्हा या गावात पाऊल ठेवीन.


अनगळ काही उत्तर देणार तोच पुजारीबुवा तिथे आले.
मला याचा विश्वास वाटतो, साहेब.
आणि संस्कृत शिकण्यासाठी रामने कसा यशस्वी प्रयत्न केला ते त्यांनी सांगितले.
अनगळांनी कमरबंदाकडे हात नेला आणि थैली काढली.
गड्याच्या कामासाठी हा पोर जन्मलेला नाही!
हे घे. माझा तुला आशीर्वाद आहे. तुझ्या मनासारखं यश मिळव!
काशीचा प्रवास दूरचा, अवघड. पण सोळा वर्षांच्या रामने तो जिद्दीने पार पाडला. काशी क्षेत्र गाठले.
माते! आजपर्यंत तुझ्या लक्षावधी आश्रितांना तू ज्ञानगंगा पाजलीस. मीही ज्ञानाचा भुकेला होऊन तुझ्या चरणांशी आलो आहे. मला ज्ञान देऊन शहाणा कर! मला आईचं रक्षण दे- लाथाडू नकोस!




उत्तम पाठशाळेची चौकशी करीत तो गावभर हिंडला.
पायगुंडे शास्त्रींची शाळा सर्वोत्कृष्ट मानतात. गुरुजी स्वतः प्रेमळ स्वभावाचे आहेत.
राम शास्त्रीबुवांकडे गेला.
गुरुजी, दक्षिणेतल्या माहुली क्षेत्रातून मी आलोय. विद्या शिकायची आहे. मला आपला शिष्य करा!
यापूर्वी कुठे शिक्षण घेतलं आहेस? कुठपर्यंत?
राम खजील झाला.
पूर्वी कधीही मी शाळेत गेलेला नाही.
अस्सं!
एकंदर प्रकार गुरुजींच्या तेव्हाच लक्षात आला.
बरं-बरं! शिकायची इच्छा आहे ना? पुष्कळ झालं! मी शिकवीन तुला!



अगदी मुळारंभापासून शिकवतो. तुला विद्वान करतो!
मी आपली निराशा करणार नाही, गुरुजी.
रामने विद्याभ्यास सुरू केला. तो आस्थेने शिकत होता. गुरुजींना त्याला एकदाही रागवावे लागले नाही.
चुकलास. मी सांगतो तसं म्हण.
दुसऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा राम वयाने मोठा होता. त्यामुळे ते त्याची चेष्टा करीत.
ए राम! हे बघ– आम्हालाही मिशा आल्या!
पण राम कधी चिडत नसे. त्यामुळे तो सर्वांचा आवडता झाला. एके दिवशी–
राम, तू काय करतो आहेस?
हे गहू पडलेत ना– जितके दाणे त्यांत आहेत तितकेवेळा श्लोक पाठ करतोय. असं केलं तरच माझ्या वयात संस्कृत शिकता येईल.


अशी बारा वर्षे निघून गेली. वेद, वेदांग आणि शास्त्रे यांत राम पारंगत झाला.
आणि एक दिवस—
राम, उद्या तुला शास्त्री म्हणून दीक्षा देऊ. मग तू जाऊ शकतोस.
दुसऱ्या दिवशी—
गुरुजी, आपण मला या पदावर पोचवलंत. गुरुदक्षिणा म्हणून मी काय देऊ?
विद्या विकू नकोस. एवढं केलंस की मला दक्षिणा मिळाली! राजा, समाज नि न्याय-संस्था यांना तुझ्या ज्ञानाचा लाभ दे!
समारंभ संपल्यावर रामशास्त्री आपल्या माहुली क्षेत्राकडे परत निघाले. गुरुजींची दक्षिणा पुरी करण्याचा त्यांनी निर्धार केला होता.


रामशास्त्री माहुलीत पोचताच श्रीमंत माधवराव पेशव्यांकडून त्यांना निमंत्रण गेले.
संस्कृतचे महापंडित रामशास्त्री प्रभुणे माहुलीत आले आहेत. त्यांना बोलावून घ्या.
रामशास्त्री पुणे दरबारी आले तेव्हा–
दरबारचे एक न्यायाधीश म्हणून आपली नेमणूक करू इच्छितो.
श्रीमंत, हा माझा बहुमान आहे.
माधवराव कुशल राज्यकर्ता होता. पण जन्माने ब्राह्मण, त्यामुळे त्याचा बराचसा वेळ धर्मकर्मात खर्च होई. पुष्कळदा राज्याची कामे त्यामुळे मागे पडत.
दरबार भरून एक तास झाला अजून श्रीमंतांची पूजा चालू आहे.
काहीतरी करायला हवं.
रामशास्त्र्यांनी पेशव्यांना निरोप धाडला. पण–
शास्त्रीबुवांना थांबायला सांगा. अजून संध्या व्हायची आहे.


दूत जेव्हा हात हलवीत परत आला–
राज्यकर्ता आपल्या कर्तव्याला चुकतो आहे! पण त्याला न दुखवता हे कसं सांगावं?
आणि रामशास्त्र्यांना युक्ती सुचली! देवघरातून बाहेर पडून पेशवे दरबारात येताच–
श्रीमंत माझा राजीनामा स्वीकारावा. मी काशीला निघालो आहे.
कशासाठी?
ब्राह्मण पडलो ना? काही कर्मकांड करायला हवं! आणि हे बेटं न्यायाधीशपद त्याच्या आड येतंय!
शास्त्रीबुवांचा टोमणा पेशव्यांच्या लक्षात आला.
आपण चतुर आहात, शास्त्रीबुवा! राज्यकारभार आधी, हे अगदी खरं! चलावं दरबारात!


रामशास्त्र्यांवर पेशव्यांची मर्जी उत्तरोत्तर वाढत चालली. दरबारचे सरन्यायाधीश मरण पावताच त्यांची जागा रामशास्त्र्यांना देण्यात आली.
काही महिन्यांनंतर—
हंगामाचे दिवस आहेत. माहुलीला जाऊन यावं.
यांची पालखी माहुली क्षेत्रापाशी येते तोच—
माझा औत! माझे बैल! दया करा हो!
माझा एकुलता पोर आहे हो! मी विधवा... माझ्या शेताकडे कोण पाहणार?
रामशास्त्री लगेच पालखीतून उतरले.
काय झालं? काय गडबड आहे ही?
श्रीमंतांचे शिपाई आमची शेतं उध्वस्त करताहेत— तरण्याबांड पोरांना धरून नेताहेत!


रामशास्त्र्यांनी शेतावरून नजर फिरवली.
चल पाहू!
नाहीतर सक्तीने न्यावं लागेल!
नाही-नाही!
रामशास्त्री संतापले.
चल माझ्या मागून!
थांबा! काय चालवलंय हे? सोडा त्याला!
आम्ही काय करणार? सरकारला पन्नास मजूर हवे आहेत. आम्ही ते गोळा करतो आहोत!
सोडा त्या शेतकऱ्यांना! श्रीमंतांजवळ मी बोलेन.


शास्त्रीबुवांकडून संरक्षण मिळेल अशी खात्री झाली. आता शेतकरी हलेनात.
आम्ही बिलकुल येणार नाही!
आम्ही सुभेदारांचा हुकूम पाळतो आहोत. हे आले नाहीत तर आम्हाला यांना पकडावं लागेल!
तुमचं कर्तव्य तुम्ही करा. मी श्रीमंतांना त्यांची बाजू ऐकवतो.
शिपायांनी शेतकऱ्यांना गिरफदार करून पेशव्यांपुढे नेले.


रामशास्त्र्यांवर आरोप केलेले ऐकून पेशवे थक्क झाले.
शास्त्रीबुवा, तुम्ही म्हणे अंमलदारांच्या कामात व्यत्यय आणलात?
माझी बाजू श्रीमंतांनी ऐकून घ्यावी.


जरूर, बोला काय ते.
हे कापणीचे दिवस आहेत. शेतकरी या वेळी शेतावर नसतील तर सबंध पीक फुकट जाईल. परिणामी दुष्काळ पडेल. आणि त्याचा दोष राज्यकर्त्यांवर येईल.


कुणाही प्रजाजनांना आपण हक्काने बोलावू शकता. पण त्यातही विवेक ठेवायला हवा.
गरज पडेल तेव्हा हेच शेतकरी दौलतीच्या सेवेला धावतील!
जरूर येऊ आम्ही!
जरूर येऊ!
आमची बायका पोरंबी येत्याल!
पटलं मला तुमचं, शास्त्रीबुवा. यापुढे आमच्या राज्यात सक्तीची बिगारी बंद!
शेतकऱ्यांना माफी केली आणि परत पाठवले. रामशास्त्र्यांच्या न्यायबुद्धीचे सर्वांनी कौतुक केले. साऱ्या मराठी राज्यात रामशास्त्र्यांचे नांव ज्याच्या त्याच्या तोंडी


माधवरावाची प्रकृती खालावत चालली होती. एक दिवस ती फारच बिघडली. बंधू नारायणराव आणि रामशास्त्री बिछान्याजवळ होते.
१५
माझा मृत्यू जवळ आला आहे. मला राघोबादादांना भेटायचंय.
श्रीमंतांनी चिंता करू नये. बोलावणं धाडतो.
रघुनाथराव ऊर्फ राघोबा हा माधवरावाचा काका. तो व त्याची महत्त्वाकांक्षी पत्नी आनंदीबाई माधवरावाविरुद्ध नेहमी कारस्थाने रचीत. त्यामुळे पेशव्यांनी त्यांना नजरकैदेत टाकले होते.
श्रीमंत आपल्याला भेटू इच्छितात.
राघोबा माधवरावाच्या रुग्णशय्येजवळ पोचला तेव्हा-
काका, आम्ही आपल्याला मुक्त केलंय. झालं गेलं विसरून जा. नारायणाला तुमच्या पदरात टाकतो त्याला पेशवा करा आणि त्याच्या नावाने तुम्ही कारभार चालवा!


राघोबादादा खूष झाले. मोठ्या आनंदातच ते आनंदीबाईकडे आले.
आनंदी, खुशखबर! आपला बंदिवास संपला. माधवाचा अंत जवळ आला आहे. आता नारायण नाममात्र पेशवा होणार अन् सत्तेची सूत्रं माझ्या हाती येणार!
सिंहासन नसेल तर सत्ता काय कामाची? मुजरे झडणार नारायणाला आणि त्याची कामं उपसणार तुम्ही!
काळजी करू नकोस, आनंदी! माझेही काही आडाखे आहेत!
काही दिवसांनंतर राघोबाने आनंदीबाईला जवळ बोलावले.
हे वाच, म्हणजे तुझ्या लक्षात येईल.




पत्र सुमेरसिंग नावाच्या हस्तकाला लिहिलेले होते.
ठरलेप्रमाणे नारायणरावांस धरावे. तुम्हास रक्कम देऊ...
'धरावे' रावे' का नाही?
इथे पुरेसा उजेड नाही. बाहेर जाऊन वाचते.
लवकरच आनंदीबाई पत्र घेऊन परत आली.
उत्तम! आता त्यावर तुमचा शिक्का मारा. आजच्या आज रवाना करते.
आपण एका खुनाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करीत आहो याची राघोबाला कल्पना नव्हती!
राघोबाचे पत्र सुमेरसिंगाला मिळताच–
दादासाहेब 'धरण्याची' भाषा बोलले होते. 'मारण्याची नाही. नंतर विचार बदललेला दिसतो! मला काय करायचंय म्हणा! चलो सिपाही!


आपल्या लोकांना घेऊन सुमेरसिंग नारायणरावाच्या महालात घुसला.
नारायणराव घाबरून राघोबाकडे पळाला.
काका, मला वाचवा! ... काका!
राघोबा गोंधळून गेला. पण आनंदीबाईने त्याला डोळे वटारून बजावले की 'जागचे हलू नका!'
काका.. काका! ...आई ग!



दिवसाढवळ्या नारायणरावाचा खून झाल्याचे वृत्त रामशास्त्र्यांनी ऐकले तेव्हा त्यांची वाचा कुंठित झाली. ते खोलीत येरझारा घालू लागले.
अकस्मात रस्त्यावर चाललेल्या गडबडीने त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी खिडकीबाहेर पाहिले. राघोबा मिरवणुकीने दरबाराकडे निघाला होता.
काय हे ?
ते दृश्य पाहून त्यांना उबग आला. ते मागे वळले. तोच...
...पेशव्यांच्या शरीररक्षकाची पत्नी त्यांची वाटच पहात उभी होती.
तुम्ही ?.. काय हवंय तुम्हाला ?
न्याय !


सत्य सांगण्याची छाती कुणाला होईल?
मला होईल! मी सांगते नाव...
रघुनाथराव दादा!
काय? नारायणरावांचे खुद्द काका? बाई, अफवा पसरवणं धोक्याचं आहे!
माझ्याजवळ पुरावा आहे, हे पत्र! माझ्या घरधन्यांनी हे दादासाहेबांच्या शिपायांकडनं हिसकावलं- जिवाची पर्वा न करता!... वाचा ते, आणि न्याय द्या!


राज्यारोहण म्हणे! हा निघालो मी दरबारात. एक क्षण दवडून चालणार नाही!
दरबारात राघोबाची स्वारी पेशव्यांच्या गादीकडे निघाली होती. इतक्यात-
थांबा! मी सरन्यायाधीश आहे. पेशव्यांना मसनदीकडे नेण्याचा अधिकार माझा आहे!
रामशास्त्री दरबारात आलेले पाहून राघोबाला बरे वाटले. ते येतील अशी त्याची अपेक्षा नव्हती.
शास्त्रीबुवा, नारायणाच्या मृत्यूने माझ्या काळजाचे तुकडे झाले हो! तुम्हाला कल्पना नसेल- मला तो मुलासारखा होता!
तुमच्या भावना मला कळतात, श्रीमंत!




IRBK-0115872


दरबारी जन स्तंभित झाले.
शास्त्रीबुवा! आपण फार पुढे जाता आहा, जपून बोला!
मी पुन्हा बोलतो, रघुनाथराव भेकड आहे. आपल्या पुतण्याचा खून करून तो गादी बळकावतो आहे!
आनंदीबाईला हा प्रकार सहन झाला नाही.
पेशव्यांचा उघड उपमर्द करणारा हा भिक्षुक! तुमच्यापैकी एकाचीही छाती नाही याचं तोंड बंद करण्याची?
नाही! मातोश्री! या दरबारात पुरुष उरले नाहीत हेच खरं! नाहीतर एक खुनी माणूस मसनदी-पर्यंत जाऊच शकला नसता!
राघोबाची आता गाळण उडाली.
काय? मी- मी - नारायणरावाला मारलं? कोण- कोण बोलतो असं?
इतक्यात राघोबाचा शिपाई रामशास्त्र्यांवर धावून गेला.
ए भटा! आत्ता तुझं तोंड बंद करतो!


न डगमगता रामशास्त्री पुढे झाले.
छान केलंस! धर ती तलवार उभी.. उंच! दिवंगत पेशव्यांच्या सरदारांना पेशव्यांच्या रक्ताचे ते डाग स्पष्ट दिसू देत!
रामशास्त्र्यांनी आपल्या कमरबंदातून ते पत्र बाहेर काढले.
दादासाहेब! या पत्रात तुमच्या गुन्ह्याचा स्पष्ट पुरावा आहे. आणि त्या पत्रावर शिक्का आहे तुमचा!
पत्र पाहून आनंदीबाई पांढरीफटक पडली. आपल्या शिपायांकडे वळून —
पाहता काय? बेड्या घाला त्याला!
शिपाई पुढे धावताच दोन सरदार मध्ये पडले.
थांबा सैनिकांनो! आमच्या तलवारी न्यायाला साथ देतील! ... शास्त्रीबुवा, काय आहे त्या पत्रात?